महाराष्ट्रशासन
अपरपोलीसमहासंचालकवसंचालक,
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्रराज्य, पुणेयांचेकार्यालय, चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे-411 008
Email: hcbbranch@mahpolwireless.gov.inWebsite : mahpolwireless.gov.in
Ph.No. 02025656908(O) 020-25652505(GEN)

क्र.आस्था-२/प्रलि/आज्ञांकित कक्ष/२०२४/1013

पुणे, दिनांक : ०२/०४/२०२४ 03

विषय :- आज्ञांकित कक्षात उपस्थित राहणेबाबत.

--- ००० ---

**परिपत्रक :-**

आमचे असे निदर्शनास आले आहे की, पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस अधिकारी / कर्मचारी हे कोणत्याही दिवशी त्यांचे बदल्याबाबत, संभाव्य पदोन्नतीबाबत व इतर अडचणीबावत विनंती मांडण्यास या कार्यालयात संबंधित घटक प्रमुखांचे/नियंत्रण अधिकाऱ्यांचे पूर्व परवानगी शिवाय उपस्थित राहतात. सदरबावत सर्वांना सुचित करण्यात येते की, त्यांनी त्यांचे नियंत्रण अधिकारी यांची पुर्वपरवानगी घेऊन त्यांचे अभिप्रायासह फक्त शुक्रवारी आज्ञांकित कक्षात उपस्थित राहावे. बरेचशे अंमलदार कोणत्याही दिवशी वरिष्ठांच्या पूर्वपरवानगी शिवाय आज्ञांकित कक्षात उपस्थित राहण्यासाठी या कार्यालयात येत आहेत. ही बाब प्रशासकीय दृष्टीकोनातून उचित नाही. तरी आज्ञांकित कक्षात उपस्थित राहण्याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) यापुढे प्रत्येक पो.अधिकारी, बि.सं./ अंमलदार यांचे आज्ञांकित कक्षाबाबतच्या अर्जावर संबंधित पोलीस अधीक्षक बि.सं./ पोलीस उप आयुक्त बि.सं. यांनी आपले अभिप्राय देऊनच प्रत्येक शुक्रवारी सकाळी ११.०० वा. इकडील कार्यालयास आज्ञांकित कक्षात पाठवावे.

२) आज्ञांकित कक्षासाठी थेट अर्ज अथवा थेट प्रत्यक्ष मुलाखतीसाठी या कार्यालयात अधिकारी/ अंमलदार हजर राहणार नाहीत, अशी समज आपले विभागातील सर्व अधिकारी/ अंमलदार यांना देण्यात यावी.

**(मा.पोलीस उप महानिरीक्षक
यांचे मान्यतेने)**

**( कविता शिंदे )**
कार्यालय अधिक्षक
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस दळणवळण व परिवहन महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे कार्यालय.

प्रति,

पोलीस अधीक्षक , पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, मुख्यालय, पुणे
पोलीस अधीक्षक , पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, पूर्व विभाग, नागपूर/ पश्चिम विभाग, पुणे/ मध्य विभाग, छ.संभाजीनगर
पोलीस उप आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग,उत्तर / दक्षिण मुंबई.

प्रत : पोलीस उप अधीक्षक बि.सं. प्रशासन,पुणे / सं.व वि., पुणे / व्ही-सॅट, पुणे/ प्रशिक्षण, पुणे/ म.भां., पुणे / परवाना शाखा (प्रसिध्दीसाठी) / सर्व परिक्षेत्र
सर्व पोलीस निरीक्षक बि.सं.